# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.05.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज उदयोन्मुख ईशान्य भारत गुंतवणूकदार परिषदेचं दिल्लीत उद्घाटन
2. जम्मू आणि काश्मिरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्यासह इतर पाच जणांवर सीबीआयकडून आरोपपत्र दाखल
3. हावर्ड विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर ट्रम्प प्रशासनाकडून बंदी आणि
4. राजस्थान वगळता देशाच्या बहुतांश भागात पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<u>पीएम ईशान्य</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत उदयोन्मुख ईशान्य भारत गुंतवणूकदार परिषदेचं उद्घाटन होणार आहे. इशान्येकडील राज्यांमधील संधी अधोरेखित करणे आणि जागतिक तसंच देशांतर्गत गुंतवणूक आकर्षित करणं हा या दोन दिवसांच्या परिषदेचा उद्देश आहे. परिषदेत मंत्रीस्तरीय चर्चासत्रे तसंच चर्चा, बैठका, स्टार्टअप्स आणि धोरणांचे प्रदर्शन तसंच राज्य सरकार आणि केंद्रीय मंत्रालयांच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देणाऱ्या संबंधित उपक्रमांचा समावेश असेल. गुंतवणुकीला प्रोत्साहन देणाऱ्या क्षेत्रांमध्ये पर्यटन आणि आतिथ्य, कृषी-अन्न प्रक्रिया आणि संबंधित क्षेत्रे; वस्त्रोद्योग, हातमाग आणि हस्तकला, आरोग्यसेवा, शिक्षण आणि कौशल्य विकास, माहिती तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि दळणवळण सुविधा, ऊर्जा आणि मनोरंजन आणि क्रीडा यांचा समावेश आहे.

**<u>शौर्य पुरस्कार</u>**

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात काल झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. पहिल्या टप्प्यात सैन्य दलं, केंद्रीय तसंच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना काल प्रदान करण्यात आलेल्या पुरस्कारांमध्ये सहा कीर्तीचक्र आणि 33 शौर्यचक्रांचा समावेश आहे. त्यातील चार कीर्तीचक्र आणि सात शौर्यचक्रं मरणोत्तर देण्यात आली आहेत.

**<u>जयशंकर-बर्लिन</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर काल बर्लिनमध्ये युरोपातील भारतीय राजदूतांच्या प्रादेशिक परिषदेत उपस्थित होते. समाजमाध्यमांवरील संदेशात माहिती देताना, त्यांनी भारताच्या ऑपरेशन सिंदूर आणि दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुतेचं धोरण यावर चर्चा झाल्याचं नमूद केलं.

**<u>संसदीय शिष्टमंडळ दौरा</u>**

दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी तीन उच्चस्तरीय भारतीय शिष्टमंडळ प्रमुख देशांच्या दौऱ्यांवर रवाना झाली आहेत. उर्वरित चार शिष्टमंडळे देखील पुढील काही दिवसांत वेगवेगळ्या देशांना भेट देणार आहेत.

**<u>सत्यपाल मलिक</u>**

जम्मू आणि काश्मिरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक आणि इतर पाच जणांवर, किरू औष्णिक उर्जा प्रकल्पासंदर्भात केंद्रीय अन्वेषण विभागानं आरोपपत्र दाखल केलं आहे. 2022 मध्ये, जम्मू आणि काश्मीर सरकारने किरू जलविद्युत प्रकल्पातील 2200 कोटी रुपयांच्या बांधकामाच्या कंत्राटातील कथित भ्रष्टाचाराची सीबीआय चौकशी करण्याची विनंती केली होती. या प्रकरणी चिनाब व्हॅली पॉवर प्रोजेक्ट्सचे तत्कालीन अध्यक्ष नवीन कुमार चौधरी आणि इतर अधिकारी एमएस बाबू, एमके मित्तल आणि अरुण कुमार मिश्रा यांच्यासह पटेल इंजिनिअरिंग लिमिटेड यांचा समावेश आहे. किरू जलविद्युत प्रकल्प ही जम्मू आणि काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातील चिनाब नदीवर विकसित केली जात असलेली योजना आहे.

**<u>हावर्ड विद्यार्थी प्रवेश</u>**

अमेरिकेतल्या हावर्ड विद्यापीठाला परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठीची परवानगी ट्रम्प प्रशासनाने काल रद्द केली. अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभागाने दिलेल्या निवेदनामध्ये, हावर्ड आता परदेशी विद्यार्थ्यांची नोंदणी करु शकत नसल्याचे आणि विद्यमान परदेशी विद्यार्थ्यांना यांना स्थानांतर करावे लागेल किंवा आपला कायदेशीर दर्जा गमवावा लागेल असं नमूद केलं आहे. यामुळे हावर्ड विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या संघटनेच्या एका मोठ्या भागावर त्याचा परिणाम होणार आहे. विद्यापीठानुसार सध्या त्यांच्याकडे 9 हजार 970 आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठानं जारी केलेल्या निवेदनात या निर्णयाचा तीव्र निषेध केला आहे.

**<u>युनुस पदभार</u>**

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार प्रोफेसर मुहम्मद युनूस त्यांच्या पदावरून पायउतार होण्याची शक्यता असल्याचं बांगलादेशचं आघाडीचं वृत्तपत्र डेली स्टारने सुत्रांच्या हवाल्यानं म्हटलं आहे. काल संध्याकाळी सल्लागार परिषदेच्या बैठकीत अनधिकृत चर्चेदरम्यान युनूस यांनी राजीनामा देण्याची आणि दूरदर्शनवरील भाषणाद्वारे राष्ट्राला संबोधित करण्याची इच्छा व्यक्त केली असल्याचं वृत्तपत्रानं म्हटलं आहे.

**<u>मणिपूर एनआयए</u>**

मणिपूरमध्ये उसळलेल्या वांशिक हिंसाचाराशी संबंधित प्रकरणांच्या सुनावणीसाठी केंद्र सरकारनं मणिपूरमध्ये विशेष एनआयए म्हणजे राष्ट्रीय तपास संस्था न्यायालयाची स्थापना केली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने मणिपूर उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांशी सल्लामसलत करून, चुराचंदपूर जिल्ह्यातील सत्र न्यायालयाला विशेष एनआयए न्यायालय म्हणून नियुक्त केले आहे.

**<u>चागोस</u>**

दिएगो गार्सियासह चागोस द्वीपसमूहाला सार्वभौमत्व पुन्हा बहाल करण्याबाबत इंग्लंड आणि मॉरिशस दरम्यान झालेल्या कराराचे भारताने स्वागत केलं आहे. परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या निवेदनामध्ये, या द्वीपक्षीय कराराद्वारे दीर्घकाळ सुरू असणाऱ्या चागोस वादाचे औपचारिक निराकरण होणे हा एक मैलाचा दगड असल्याचं म्हटलं आहे. मॉरीशसचा दृढ आणि दीर्घकालीन भागीदार म्हणून भारत सागरी सुरक्षा आणि प्रादेशिक स्थिरता मजबूत करण्यासाठी आणि हिंदी महासागर क्षेत्रात शांतता आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध असल्याचंही निवेदनात म्हटलं आहे.

**अमेरिका-इराण**

अमेरिका आणि इराण यांच्यातील अप्रत्यक्ष चर्चेची पाचवी फेरी आज रोम इथं आयोजित करण्यात आली आहे. ओमानचे परराष्ट्र मंत्री सय्यद बद्र बिन हमद बिन हमूद अल्बुसैदी यांनी ही घोषणा केली. एप्रिलपासून आतापर्यंत झालेल्या चर्चेच्या चार फेऱ्यांपैकी तीन मस्कतमध्ये तर एक रोममध्ये पार पडल्या. इराणचा अणुकार्यक्रम आणि अमेरिकेनं अद्यापही न हटविलेले निर्बंध यामुळे रेंगाळलेली राजनैतिक स्तरावरील बोलणी पुन्हा सुरू करण्याच्या उद्देशानं ओमाननं या चर्चेचं आयोजन केलं आहे.

**फिचरेटिंग्ज**

जागतिक रेटिंग एजन्सी फिच रेटिंग्जने भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादन वाढीची क्षमता पुढील पाच वर्षांसाठी 0.2 टक्क्यांनी वाढवून 6 पूर्णांक चार दशांश टक्क्यांपर्यंत नेली आहे. अलीकडच्या वर्षांत देशातल्या कामगारांच्या सहभाग दरात तीव्र वाढ झाल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आहे. भारतासाठीच्या या सुधारित अंदाजात कामगारांचे योगदान, प्रामुख्याने एकंदर रोजगाराचा वाटा अधिक असल्याचं दिसून येतं. त्याच वेळी, जागतिक रेटिंग एजन्सीनं चीनच्या विकासाचा अंदाज आधीच्या चार पूर्णांक सहा दशांश टक्क्यांवरून तीन दशांश टक्क्यांनी कमी करुन चार पूर्णांक 3 दशांश केला आहे. पुढील पाच वर्षांत 10 उदयोन्मुख बाजारपेठांच्या अर्थव्यवस्थांसाठी संभाव्य जीडीपी वाढीमध्ये फिचच्या सुधारित मूल्यांकनाचा भाग म्हणून हे बदल केले आहेत.

**हॉकी**

FIH हॉकी प्रो लीग 2024-25 अंतर्गत युरोपियन लेगसाठी हॉकी संघटनेच्यावतीनं काल 24 सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघ जाहीर करण्यात आला. पुढील महिन्यात, 7 ते 22 जून या कालावधीत नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीन आणि बेल्जियममधील अँटवर्प इथं या स्पर्धेतील सामने खेळले जाणार आहेत. हरमनप्रीत सिंग कर्णधार म्हणून संघाचं नेतृत्व करेल तर हार्दिक सिंग याची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे.

**खेलो इंडिया**

दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत 4 सुवर्ण, 4 रौप्य आणि 6 कास्य पदकांसह 14 पदकांची लयलूट करत महाराष्ट्राने प्रथम स्थानावर झेप घेतली आहे. कालच्या तिसऱ्या दिवशी 50 ते 55 किलो वजनी गटात जयश्री शेटे हिने सुवर्ण कामगिरी केली. रामचंद्र बदक आणि सचिन गर्जे, ओंकार अभंग, वैभव काळे आणि अंशुल कांबळे यांनी आपापल्या गटात रौप्य पदकं पटकावली. कबड्डीमध्ये महिला गटात महाराष्ट्राने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**क्रिकेट**

आय पी एल क्रिकेटमध्ये काल लखनौ सुपर जायंट्स संघाने गुजरात टायटन्सचा 33 धावांनी पराभव केला. लखनौने सामनावीर ठरलेल्या मिचेल मार्शच्या शतकाच्या जोरावर 235 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल गुजरात संघ 202 धावा करू शकला.

**हवामान**

कोकण आणि गोव्यात उद्यापर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान खात्यानं दिला आहे. पुढील दोन दिवसात. मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, अंदमान निकोबार बेटे, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय,

छत्तीसगड, पश्चिम बंगाल आणि गुजरातमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. झारखंड, केरळ, लक्षद्वीप, मराठवाडा आणि उत्तराखंडमध्येही पावसाचा अंदाज आहे. उर्वरीत देशात राजस्थान, उत्तर भारत वगळता ईशान्य भारतातील विविध भागातही वादळी वारे आणि विजांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, पुढील दोन-तीन दिवसांत पश्चिम राजस्थानमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

## याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार